# -:जाहीर अवाहन:-

राष्ट्रीय कृषी विकास योजना-२०१९-२० अंतर्गत बहुवर्षीय वैरण पिकाची लागवड व उत्पादन करून मुरघास तयार करणे या योजनेचा लाभ उस्मानाबाद जिल्हयातील लाभार्थीना ध्यावयाचा आहे.

तरी ईच्छूक लाभार्थीनी अर्जाच्या स्वरूपातील प्रस्ताव आपल्याशी निगडीत असलेल्या पशुवैधकीय दवाखान्यामार्फत संबधीत तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी ( विस्तार ) पंचायत समिती यांच्याकडे दिं. ०९-१०-२०२० ते ०८-११-२०२० पर्यंतच्या कालावधीत सादर करावे असे अवाहन करण्यात येत आहे . अर्जाचा नमुना आणि प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे अटी व शर्ती याबाबतचा तपशील संबधीत तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी ( विस्तार ) पंचायत समिती यांच्याकडे उपलब्ध आहे. ईच्छूक लाभार्थीना सदरील योजनेचा लाभ देण्यासाठी खालील प्रमाणे काही प्रमुख अटी व शर्ती विचारात घेतल्या जातील . ईतर अटी व शर्ती याबाबतचा तपशील वरील प्रमाणे लाभार्थीशी निगडीत असलेल्या संबधीत तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी ( विस्तार ) पंचायत समिती यांच्याकडे उपलब्ध आहे.

१) सदर योजनेअंतर्गत ५ मे.टन क्षमतेचा मुरघास (बॅग स्वरूपात) तयार करणे व १० मे.टन क्षमतेचा मुरघास (बांधकाम) तयार करणे असे दोन घटक आहेत.

२) योजनेअंतर्गत बहुवर्षीय वैरण पिकांच्या लागवडीसाठी १०० टक्के अनुदान , विध्युतचलीत कडबाकुटटी यंत्रासाठी ५० टक्के अनुदान , आणि मुरघास तयार करण्यासाठी ६० टक्के अनुदान देय असेल.

३) पशुपालकाकडे ५ ते १५ पशुधन असल्यास अशा पशुपालकांना ५ मे.टन क्षमतेचा मुरघास तयार करण्याच्या युनीटच्या योजनेचा लाभ ध्यावयचा आहे आणि १५ पेक्षा जास्त पशुधन असल्यास अशा पशुपालकांना १० मे.टन क्षमतेचा मुरघास तयार करण्याच्या युनीटच्या योजनेचा लाभ ध्यावयचा आहे .

४) योजनेअंतर्गत करावयाच्या बहुवर्षीय पिकाच्या लागवडीसाठी पशुपालक संकरीत हत्ती गवत या वैरण पिकाच्या BNH-१०, संपूर्णा( DNH-६),यशवंत,जयवंत,गुणवंत,CO-३ , CO-४ या प्रजाती व याशिवाय गिनी गवत या वैरण पिकाची लागवड करू शकतील .

५) योजनेअंतर्गत उपलब्ध झालेल्या निधीमधून १६ टक्के अनुसूचीत जाती प्रवर्ग , ८ टक्के अनुसूचीत जमाती प्रवर्ग , ३० टक्के महिला व ३ टक्के अपंग पशुपालकांना योजनेचा प्राधान्याने लाभ ध्यावयाचा आहे.

६) यापूर्वी विध्युतचलीत कडबाकुटटी यंत्र खरेदीसाठी शासकीय अनुदानाचा लाभ घेतलेले लाभार्थी तसेच मुरघास युनीटचा लाभ ईतर कोणत्याही शासकीय योजनेमधून घेतला असल्यास असे लाभार्थी सदरील योजनेचा लाभ घेण्यास अपात्र राहतील .

७) पशुसंवर्धन विभागाच्या विविध कार्यक्रमात उदा. कृत्रीम रेतन ,पशुधन विमा,अनुवंशीक सुधारणा कार्यक्रम, रोगप्रतिबंधक लसीकरण ई. मध्ये जे पशुपालक सहभागी होतात अशा पशुपालकांना सदरील योजनेचा प्राधान्य लाभ ध्यावयाचा आहे.

८) विध्युतचलीत कडबाकुटटी यंत्राच्या वापरासाठी स्वत:च्या नावे किंवा कुटूंबातील ईतर व्यक्तीच्या नावे आवश्यक वीज जोडणी सुविधा असणे गरजेचे आहे.

९) लाभार्थीनी स्वहिशाची कामे स्वखर्चाने करावयाची आहेत .

१०) एका कुटूंबातील एकाच व्यक्तिस लाभ ध्यावयाचा आहे.

११) बहुवार्षिक गवत प्रजातीची चारा पिके घेण्याकरीता मुरघास तयार करण्याच्या युनीटसाठी०.१०/०.२०/०.४० हेक्टर जमीनीचे क्षेत्रावर बहुवर्षीय वैरण पिकाची लागवड करावयाची आहे.

१२) योजनेचा लाभ देण्यासाठी निवडलेल्या लाभार्थीनी ५ मे.टन क्षमतेचा मुरघास तयार करण्याच्या युनीटसाठी १ अश्व शक्तीचे आणि १० मे.टन क्षमतेचा मुरघास तयार करण्याच्या युनीटसाठी २ अश्व शक्तीचे विध्युत चलीत कडबाकुटटी यंत्र स्वखर्चाने खरेदी करावयाचे आहे. याकरिता १ अश्व शक्ती विध्युत चलीत कडबाकुटटी यंत्र खरेदी साठी रू.६०००/- आणि २ अश्व शक्ती विध्युत चलीत कडबाकुटटी यंत्र खरेदी साठी रू.८०००/- प्रतियुनीट अनुदान अनुज्ञेय आहे.

( P.T.O )

१३) योजनेअंतर्गत खरेदी करावयाचे विध्युतचलीत कडबाकुटटी यंत्र हे भारतीय मानक संस्थेच्या प्रमाणपत्रानुसार असावे व त्यासोबतची विध्युत मोटार ही आयएसआय मार्क असावी. यंत्राच्या देयकावर जीएसटी नोंदणी क्रमांक व जीएसटीची रक्कम नमूद करण्यात आलेली असावी. योजनेअंतर्गत ५ मे.टन मुरघास तयार करण्यासाठी आवश्यक असलेली प्लॅस्टीक बॅग स्पेशिफीकेशन नुसार खरेदी करावयाची आहे.

१४) योजनेअंतर्गत बहुवर्षीय वैरण पिकाची लागवड करण्यासाठी आवश्यक ठोबांची खरेदी पशुपालकांनी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाची प्रक्षेत्रे ,पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाकडील प्रक्षेत्रे, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विध्यापीठ/कृषी विध्यापीठे अधिनस्त प्रक्षेत्रे , कृषी विज्ञान केंद्रे , गोशाळा/पांजरापोळ संस्था , सहकारी दुध उत्पादक संघ व बायएफ या संस्थाकडून खरेदी करावयाचे आहेत.

१५) योजनेअंतर्गत १० मे.टन क्षमतेच्या मुरघास युनिटचे करावयाचे बांधकाम हे जमिनीवर आयाताकृती व वर्तुळाकार असावे.

१६) योजनेमध्ये अनुदानाची रक्कम ही थेट लाभ हस्तांतरण योजनेद्वारे लाभार्थीच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

१७) राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत विदर्भ व मराठवाडयामध्ये राबविण्यात येत असलेल्या १० जिल्हयामध्ये राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाने सदर योजनेअंतर्गत निवड केलेल्या गावामधील पशुपालकांना सदर योजनेचा लाभ ध्यावयाचा आहे. त्यापैकी उस्मानाबाद जिल्हयातील निवडलेल्या ५३७ गावांची यादी संबधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी विस्तार , पंचायत समिती यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त
उस्मानाबाद.